येणेप्रमाणे मिळकत जल, तरु, काष्ट, पाषाण, निधि, निक्षेप,तदंगभुत वस्तुंसह त्यातील असणारे भविष्यातील विजेचे मिटर, विज फिटिंग तसेच पाणी, टॉयलेट, वापरण्याचे हक्कांसह दरोबस्त मिळकत.

3) **मिळकतीचा इतिहासः-** वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकती पैकी प्लॉट नंबर 23 ही मिळकत आम्ही लिहून देणार यांनी सौ. अमी जहांगिर इराणी यांचेपासून कायम फरोक्त खरेदी घेतलेली असुन सदरचे खरेदीखताचा दस्त मे. सह दुय्यम निबंधक वर्ग-2 नाशिक-4 यांचे कार्यालयात दस्त अनुक्रम नं. 9484/2018 अन्वये दिनांक 01/11/2018 रोजी नोंदविलेला आहे. तसेच प्लॉट नंबर 24 ही मिळकत आम्ही लिहून देणार यांनी सौ. अमी जहांगिर इरानी व श्री. जहांगिर रुस्तम इरानी यांचेपासून कायम फरोक्त खरेदी घेतलेली असुन सदरचे खरेदीखताचा दस्त मे. सह दुय्यम निबंधक वर्ग-2 नाशिक-4 यांचे कार्यालयात दस्त अनुक्रम नं. 9478/2018 अन्वये दिनांक 01/11/2018 रोजी नोंदविलेला आहे. सदरहू दस्तऐवजान्वये आम्ही लिहून देणार हे मिळकतीचे मालक झालेलो आहोत मिळकत ही आमचे कवजे वहिवाटीत व उपभोगात आहे. मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईट्सला आमचे नांव 6ड फेरफार नोंद क्र. ..... अन्वये दाखल झालले आहे. त्यानंतर सदर प्लॉट नंबर 23 या मिळकतीमधुन नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडील कॉलनी रोडचे 19.50 चौ.मी. इतके क्षेत्र कर्टींग झालेले असुन प्लॉट नंबर 24 मधुन कॉलनी रोडचे 39.82 चौ.मी. इतके क्षेत्र कर्टींग झालेले आहे. सदरहु दोन्ही प्लॉट मिळकती या फेरफार नोंद क्र. 26710 अन्वये एकत्र झालेल्या असुन नाशिक मनपाचे नाव कॉलनी रोडचे क्षेत्राकरीता दाखल झालेले आहे. आमचा बिल्डर्स व डेव्हलपर्सचा व्यवसाय असल्याने आम्ही सदरहु हक्क व अधिकारांस अनुसरुन उपरोक्त कलम 1 यात वर्णन केलेल्या मिळकतीवर मिळकत विकसीत करण्याचे हेतूने आवश्यक त्या परवानग्या घेतलेल्या आहे. लिहून देणार यांनी वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर **"ओमशांती अपार्टमेंट बी"** या नावाने इमारतीचे वांधकाम सुरु केलेले आहे. सदरचे बांधकाम आजमितीस प्रगतीपथावर आहे. सदरहु हक्क व अधिकारांस अनुसरुन लिहून देणार यांना सदर वर कलम 2 यात वर्णन केलेली फ्लॅट/सदनिका मिळकत विक्री अगर हस्तांतर करण्याचा व किंमतीची संपुर्ण रक्कम स्विकारण्याचा हक्क व अधिकार आहे त्या अधिकारात लिहून देणार यांनी वर कलम 2 मध्ये वर्णन केलेली फ्लॅट/सदनिका मिळकत विक्रीस

काढली व याची जाण तुम्ही लिहून घेणार यांना झाली व त्यानुसार दोहो पक्षांत चर्चा होवून सौदा पक्का झाला व त्यानुसार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभांत प्रस्तुतचा दस्त लिहून व नोंदवून दिलेला आहे.

4) **बिनशेती परवानगीः-** वर कलम 1 मध्ये वर्णन केलेली मिळकत ही मे. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी त्यांचेकडील हुकूम नं. मह/कक्ष-3/एनएपीनं/337/2001, दिनांक 19/07/2001 अन्वये विनशेतीकडे वर्ग केलेली आहे.

5) **मिळकतीचा ले-आऊटः-** वर कलम 1 मध्ये वर्णन केलेली मिळकत ही अंतिम मंजुर ले-आऊटमधील असुन सदरचा ले-आऊट हा नाशिक महनगरपालिका नाशिक यांचे कार्यालयाकडुन पत्र क्र. जावक क्र./नगररचना विभाग/अंतिम/बी-4/59, दिनांक 09/07/2004 अन्वये मंजूर केलेला आहे.

6) **बांधकाम परवानगी व बांधकाम नकाशा मंजूरीः-** वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर करावयाचे बांधकामासाठी लिहून देणार यांनी आर्किटेक्ट/सुपरवायझर श्री. लहू रामनाथ वाघ यांची तर स्ट्रक्चरल इंजिनिअर म्हणुन श्री. रोहन घुमरे यांची नेमणूक केलेली आहे व त्यांचे देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम सुरु आहे. वर कलम 1 मधील मिळकतीवर करावयाचे बांधकामाचा नकाशा **नाशिक महानगरपालिका नगररचना विभागाकडुन जावक नंबर एल.एन.डी./ बीपी/ पाथर्डी/ डीसीआर/1546/2019, दिनांक 07/08/2019** अन्वये मंजुर करुन घेतलेला असुन सदर नकाशा हा आर्किटेक्ट/सुपरवायझर व लिहून देणार यांच्या दफ्तरी उपलब्ध आहे.

7) **टी.डी.आर.:-** सदरहु मिळकतीवर बांधकाम करणेकामी लिहून देणार यांनी ..... चौ.मी. इतक्या क्षेत्राचा टी.डी.आर. खरेदी घेतलेला असुन सदरचे खरेदीखत मे. सह दुय्यम निबंधक वर्ग-2 नाशिक यांचे कार्यालयात दस्त क्र. ...../..... दिनांक ..... रोजी नोंदविलेले आहे. सदरच्या मिळकतीवर लिहुन देणार यांनी टी.डी.आर. वापरुन इमारत नकाशा तयार केलेला असुन सदर इमारत नकाशा व त्यानुसार इमारतीचे बांधकाम चालु केलेले आहे.

Scanned by CamScanner